क्रमांक/जिपना/पंसवि/स्था-१/सीआर/८५१/२०२०
कार्यालय:- पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद, नागपूर
**दिनांक :- १०.०७.२०२०.**

प्रति,

गट विकास अधिकारी,
पंचायत समिती ------------------------------(सर्व)

**विषय :- सन- २०२० मध्ये सर्वसाधारण बदल्यांची प्रक्रिया राबविण्याबाबत.**

संदर्भ :- १) या कार्यालयाचे परिपत्रक क्र. जिपना/पसंवि/स्था-/ सीआर/८४१/२०२०/दि.०९.०७.२०२०
२) मा. मु.का.अ. जि.प. नागपूर यांचे पत्र क्र. जिपना/साप्रवि/स्था-३/सीआर/८/२०/३५३४/दिनांक-०९.०७.२०२० .

उपरोक्त संदर्भिय क्रमांक ०१ चे अनुषंगाने सन २०२० मध्ये सर्व साधारण बदल्यांची प्रक्रिया करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

उपरोक्त संदर्भ क्रमांक १ वरील पत्राच्या अनुषंगाने व संदर्भ क्रमांक २ मध्ये नमुद जिल्हा परिषदेच्या गट-क (वर्ग-३) व गट -ड (वर्ग-४) च्या कर्मचा-यांच्या सर्वसाधारण स्थानांतर-२०२०ची प्रक्रीया समुपदेशनाव्दारे करावयाची आहे. त्याअनुषंगाने पशुसंवर्धन विभागाकडून नियंत्रित वर्ग-३ चे अनुक्रमे १) सहाय्यक पशुधन विकास अधिकारी ( वर्ग - ३) व २) पशुधन पर्यवेक्षक ( वर्ग - ३) या संवर्गातील तसेच आदिवासी तालुक्यातील तीन वर्ष व एकाच मुख्यालयात १० वर्ष / ३ वर्ष व त्यापेक्षा जास्तीचे वास्तव्य (कालावधी) झालेला आहे त्यांची यादी वरील संदर्भीय परिपत्रक क्र.०१ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेली आहे. तसेच विनंती वरुन बदलीकरिता बदली पात्र इच्छूक कर्मचा-यांकडून या सोबतच्या परिशिष्ट- १ मध्ये विहित नमुन्यात आवश्यक त्या अभिलेखासह खालील सुचनेनुसार आवेदन प्राप्त करुन सादर करावे.

**सुचना:**

१) वर उल्लेखित संवर्गातील बदलीस इच्छुक कर्मचा-यांकडुन संदर्भाकित शासन निर्णयातील मार्गदर्शक सुचनानुसार आवश्यक त्या अभिलेखासह परिशिष्ट-१ मधिल विहीत नमुन्यात **दिनांक १३.०७.२०२० सायंकाळी ५.४५ वाजेपर्यंत आवेदन प्राप्त** करावे. उक्त विहित मुदतीनंतर प्राप्त अर्ज विचारात घेतले जाणार नाही.

२) उपरोक्त १ नुसार प्राप्त आवेदनाची पडताळणी कार्यालयीन अभिलेखावरुन करुन सदर आवेदन योग्य /अयोग्य असल्याचे प्रमाणित करावे.

३) **तसेच परिशिष्ट -३ मध्ये दिनांक ३१.०५.२०२० पर्यंत रिक्त होणारी पदे गृहीत धरुन दिनांक ३१.०५.२०२० रोजीची रिक्त पदाची स्थिती तयार करावी.**

४) उपरोक्त प्रमाणे प्राप्त सर्व आवेदनाची माहिती परिशिष्ट - २ मध्ये संगणीकृत करुन तयार करावी.

५) उपरोक्त प्रमाणे प्राप्त परिशिष्ट -१ मधिल आवेदने आवश्यक त्या अभिलेखासह व परिशिष्ट-२ मध्ये संगणीकृत केलेली **माहिती हार्ड कॉपी व पेन ड्राईव्ह मध्ये तसेच परिशिष्ट-३ मधील रिक्त पदांची माहिती दिनांक १४.०७.२०२० ला सकाळी ११.०० वाजता या कार्यालयास संबंधित सहाय्यक प्रशासन अधिकारी /कनिष्ठ प्रशासन अधिकारी यांनी प्रत्यक्ष सादर करावी.**

६) वर नमुद परिशिष्ट-१ ,२ व ३ संदर्भीय अ.क्र. ०१ चे परिपत्रकान्वये आपणांस यापुर्वी पाठविण्यात आले आहे.

जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी
जिल्हा परिषद, नागपूर

१) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांना माहितीस सविनय सादर.
२) मा. अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांना माहितीस सविनय सादर.
३) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा) जिल्हा परिषद, नागपूर यांना माहितीस समादराने सादर.

o/c

जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी
जिल्हा परिषद, नागपूर